**सरकार तर्फे साक्षीदार क्र. –१०** | **नि.फौ.ख.क्र.१२७/२०१६**

**सरकार विरुध्द सुरेश**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की** | **निशाणी – ७१**

**माझे नांव – मंगेश सरजुप्रसाद यादव**
**वय – अंदाजे ४२ वर्ष, व्यवसाय – खाजगी नौकरी**
**राहणार – यादव नगर, कामठी**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जी.ओ. वर्मा यांच्या कडून –**

दिनांक ०७/०१/२०१६ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता बोलाविले होते. मात्र मला काहीही माहिती नाही. मी पोलीसांना सही दिली नव्हती. मी आरोपी सुरेश बोरकर यांना ओळखत नाही. आरोपीने माझ्या समक्ष सहया केल्या नव्हत्या. मला आता हस्ताक्षर व स्वाक्षरी नमुना पंचनामा दाखविला. त्यावर अनुक्रमांक १ कडे माझी सही आहे. त्यातील मजकूर माहिती नाही. पंचनाम्यास सही पुरती **निशाणी ७२** देण्यात येते.

**( साक्षीदार हा त्याच्या पूर्वीच्या जबाबाप्रमाणे कथन करीत नसल्यामुळे त्यास सहाय्यक सरकारी अभियोक्तांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. )**

हे म्हणणे खरे नाही की दिनांक ०७/०१/२०१६ रोजी पोलीसांनी मला पोलीस स्टेशन मध्ये बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपी सुरेश बोरकर यांच्या हस्ताक्षराचे नमुणे माझे समक्ष पोलीसांनी घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझे समक्ष त्याचा पंचनामा तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की तो मला वाचून दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला वाचविण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपी क्र.१, २, ४ व ५ तर्फे वकील श्री. अढाऊ व आरोपी क्र.३ तर्फे वकील श्री कांबळे यांनी नाकारला.**

वा.दा.ब.अ.क.के.

समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2024.07.30 10:54:03 +0530

कामठी
दिनांक २९/०७/२०२४

( मोहन रा. कामत )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र.१, कामठी